दिनांक १२/०५/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक बाळनाथ निवृती जोरे, पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, महावितरण, वैजापुर ग्रामीण-२, ता. वैजापुर, जिल्हा-औरंगाबाद यांनी ३,५००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव, हुद्दा | :- | बाळनाथ निवृती जोरे, पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, महावितरण, वैजापुर ग्रामीण-२, ता.वैजापुर, जिल्हा-औरंगाबाद रा.पाटील गल्ली, वैजापुर, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वैजापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेश्मा सौदागर,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ३,५००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या विहिरीसाठी वीज कनेक्शन देण्याची कारवाई करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | मुरारीपार्क, वैजापुर येथे रोडवर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांची सटाणा शिवारात ता.वैजापुर येथे शेतजमीन आहे. या शेतातील विहिरीसाठी ७.५HP चे वीज कनेक्शन देण्याची कारवाई करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे बाळनाथ जोरे, वरिष्ठ तंत्रज्ञ, महावितरण, वैजापुर ग्रामीण-२, ता. वैजापुर, जि.औरंगाबाद हे ७,०००/- शासकीय फिस व ३,५००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, बाळनाथ जोरे, वरिष्ठ तंत्रज्ञ, महावितरण, वैजापुर ग्रामीण-२, ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ७,०००/- शासकीय फिस व ३,५००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, बाळनाथ निवृत्ती जोरे, वरिष्ठ तंत्रज्ञ, महावितरण, वैजापुर ग्रामीण -२, ता. वैजापुर, जि.औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ३,५००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.श्री.राजेश बनसोडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.श्री. मारुती पंडीत, पोलीस उपअधीक्षक बी.व्ही.गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेश्मा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस नाईक/भीमराज जिवडे, रविंद्र काळे, भुषण देसाई, देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.